• वर्ष : ०३ • अंक : २५८ • पुणे • मंगळवार, दि. ०९ जून २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570**

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**














## थोडक्यात पण महत्वाचे



## टोयोटाने सादर केली नवी इनोव्हा क्रिस्टा

पुणे (आरंभ पर्व) : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय एमपीवी नवी इनोव्हा क्रिस्टा लॉन्च करण्याची घोषणा केली. नव्या बोल्ड डिझाइन एलिमेंट्स आणि अतिरिक्त सोयीसुविधांसह ही गाडी ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. टोयोटाची “एव्हर बेटर कार्स” फिलॉसफी आणि मजबूत कस्टमर-फर्स्ट अप्रोच यानुसार, हे नवीन अपग्रेड बदलत्या ग्राहक गरजा लक्षात घेऊन काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहे. त्यामुळे लाखो भारतीय कुटुंबांसाठी विश्वासार्ह मोबिलिटी पार्टनर म्हणून इनोव्हा क्रिस्टाचा वारसा अधिक मजबूत होणार आहे. दोन दशकांहून अधिक काळाच्या अपराजित आणि अद्वितीय प्रवासातून घडलेली इनोव्हा क्रिस्टा आजही भारतातील सर्वाधिक लोकप्रिय एमपीवी म्हणून ओळखली जाते. विश्वासार्हता, आराम, सुरक्षितता, लक्झरी आणि पॉवर यामुळे ती ग्राहकांची पहिली पसंती ठरली आहे. या मजबूत पायावर आधारित, नवी इनोव्हा क्रिस्टा टोयोटाच्या सतत सुधारणा करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.




## डिप्यू सिंथेस स्किल्स लॅबचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : Saishree Vitalife Hospitals आणि DePuy Synthes यांनी ऑर्थोपेडिक सर्जनांचे प्रशिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी आणि रुग्णांच्या उपचार परिणामांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी समर्पित ऑर्थोपेडिक स्किल्स लॅब सुरू केली आहे. ही स्किल्स लॅब टियर-२ आणि टियर-३ भागांतील ऑर्थोपेडिक सर्जनांसाठी प्रशिक्षण केंद्र म्हणून कार्य करेल. येथे प्रगत जॉइंट रिप्लेसमेंट तंत्रांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाईल. या उपक्रमाचा भर सर्जिकल कौशल्ये अधिक सक्षम करणे, शस्त्रक्रियांमध्ये अचूकता आणि सातत्य वाढवणे तसेच रुग्णांच्या पुनर्वसन आणि उपचार परिणामांमध्ये सुधारणा घडवून आणणे यावर आहे. सुश्री यू जिन चे म्हणाल्या “या उपक्रमाचा मुख्य उद्देश संरचित प्रशिक्षणाद्वारे सर्जनांची क्षमता विकसित करणे आणि विविध आरोग्यसेवा व्यवस्थांमध्ये रुग्णांना अधिक चांगले उपचार परिणाम मिळवून देणे हा आहे.” डॉ. नीरज अडकर म्हणाले “हे प्रशिक्षण व्यासपीठ सर्जनांना आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यास आणि अधिक कौशल्य व आत्मविश्वासासह रुग्णसेवा देण्यास मदत करेल.”

## प्रामाणिकपणाचा आदर्श; सोमनाथ पाटील यांनी परत केले सोन्याचे गंठण



बार्शी(आरंभ पर्व) : आजच्या धावपळीच्या आणि भौतिकवादी युगातही प्रामाणिकपणा जिवंत असल्याचे उदाहरण सारोळे ता.बार्शी येथे पाहायला मिळाले. वेताळ चौक परिसरातील पाटील कॉम्प्लेक्सचे मालक सोमनाथ पाटील यांना एक तोळ्याचे सोन्याचे गंठण सापडले. मौल्यवान दागिना सापडूनही कोणताही मोह न बाळगता त्यांनी तो सुरक्षित ठेवून संबंधित मालकाचा शोध सुरू केला. दरम्यान, गावातील परमेश्वर भोसले यांच्या आईचे गळ्यातील सोन्याचे गंठण हरवल्याची माहिती समोर आली. त्यानंतर सोमनाथ पाटील यांनी योग्य ती खात्री करून सदर गंठण परमेश्वर भोसले यांच्या ताब्यात दिले. विशेष म्हणजे, दोन वर्षांपूर्वी स्वतः सोमनाथ पाटील यांचे सुमारे दोन तोळे सोने हरवले होते. मात्र ते त्यांना परत मिळाले नव्हते. असे असतानाही त्यांनी सापडलेले एक तोळ्याचे सोन्याचे गंठण प्रामाणिकपणे मालकाकडे सुपूर्द करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. सोन्याचे दर गगनाला भिडलेले असताना सोमनाथ पाटील यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या कृतीमुळे समाजात विश्वास, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकी ह्या त्यांच्या या कार्याची चांगलीच चर्चा रंगली आहे. यावेळी गावातील ग्रामस्थ कल्याण पाटील, राजकुमार पाटील, अमर पाटील, भारत कुराडे, शरद कुराडे, विपिन पाटील, भागवत घुगले, गौतम कोडलिंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# नऱ्हे परिसरात गढूळ व अपुरा पाणीपुरवठा

### नागरिक संतप्त



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरातील तिडके डेअरी, मानाजी नगर आणि गोकुळ नगर भागात गेल्या काही दिवसांपासून गढूळ व दूषित व अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अपुरा आणि अस्वच्छ पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिक रहिवासी अमर बनाईत यांनी सांगितले की, "पुणे महानगरपालिकेने नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित पाणीपुरवठा करणे ही मूलभूत जबाबदारी आहे. मात्र, आमच्या भागात पिवळसर आणि गढूळ पाणी येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे."

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, नळाद्वारे येणारे पाणी अनेकदा पिवळसर रंगाचे असून त्यातून दुर्गंधीही येत आहे. दूषित पाण्याच्या वापरामुळे पोटाचे विकार, कावीळ, टायफॉईड, अतिसार यांसारखे गंभीर आजार होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होऊ शकतो.

स्थानिक नागरिकांनी आरोप केला आहे की, वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून या समस्येकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने या भागातील पाणीपुरवठ्याची तपासणी करून स्वच्छ पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

"गढूळ आणि दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. महानगरपालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन स्वच्छ पाणीपुरवठा सुनिश्चित करावा. नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागणे दुर्दैवी आहे." असे या भागातील रहिवासी राज शिनारे यांनी सांगितले.

दरम्यान, या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन संबंधित विभागाने उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

लवकरच या भागातील पाण्याची पाहणी करण्यात येईल व लवकर निर्णय घेतला जाईल असे पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात आले .

## जागतिक ट्यूमर दिन : प्रगत उपचारांमुळे मेंदूच्या ट्यूमरवर मात शक्य




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दरवर्षी ८ जून रोजी साजरा केला जाणारा जागतिक ट्यूमर दिन हा मेंदू आणि मज्जासंस्थेशी संबंधित ट्यूमरविषयी जनजागृती करण्यासाठी महत्त्वाचा दिवस मानला जातो. मेंदू किंवा पाठीच्या कण्यातील ट्यूमरचे निदान रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी धक्कादायक ठरू शकते. मात्र, आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर आणि वेळेवर निदान यांच्या मदतीने या आजारावर प्रभावी उपचार करणे आज पूर्वीपेक्षा अधिक शक्य झाले आहे. ट्यूमर म्हणजे शरीरातील पेशींची अनियंत्रित वाढ. मेंदूतील ट्यूमर सौम्य (Benign) किंवा घातक (Malignant) असू शकतो. सुरुवातीच्या टप्प्यात डोकेदुखी, अचानक येणारे झटके (Seizures), दृष्टीदोष, स्मरणशक्तीतील बदल, संतुलन बिघडणे किंवा व्यक्तिमत्त्वात होणारे बदल यांसारखी लक्षणे दिसून येऊ शकतात. अनेकदा ही लक्षणे दुर्लक्षित केली जातात, त्यामुळे निदान उशिरा होते. त्यामुळे अशा कोणत्याही लक्षणांकडे दुर्लक्ष न करता तातडीने वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

## पुण्यातील पुष्कर आगरकर ५ दिवसांपासून बेपत्ता



शिवाभाऊ पासलकर



पुष्कर आगरकर

- माहिती देण्याचे जनसेवक शिवाभाऊ पासलकर यांचे आवाहन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नारायण पेठ परिसरातील रहिवासी असलेले पुष्कर आगरकर (वय ४३) हे दिनांक ३ जून २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजल्यापासून बेपत्ता असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांसह सामाजिक संस्थांकडून प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष शिवाभाऊ पासलकर यांनी नागरिकांना मदतीचे आवाहन केले आहे. पुष्कर आगरकर हे ३ जून रोजी भरत नाट्य मंदिर, नारायण पेठ येथून बाहेर पडले होते. त्यानंतर ते घरी परतले नसल्याने कुटुंबीयांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सोलापूर, पंढरपूर व अक्कलकोट या धार्मिक स्थळांच्या परिसरात ते गेले असण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याने त्या भागातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, मंदिर परिसरातील स्वयंसेवक, एसटी स्थानके, लॉज चालक व स्थानिक ग्रुप्सना शोध मोहिमेत सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शिवा भाऊ पासलकर म्हणाले, "एका कुटुंबाचा आधार हरवला आहे. नागरिकांनी ही माहिती जास्तीत जास्त शेअर करावी. सोलापूर, पंढरपूर आणि अक्कलकोट परिसरात पुष्कर आगरकर यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांना किंवा दिलेल्या संपर्क क्रमांकांवर कळवावे. तुमचा एक फोन किंवा एक शेअरही या कुटुंबासाठी आशेचा किरण ठरू शकतो." पुष्कर आगरकर यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास विश्रामबाग पोलीस स्टेशन (०२०-२४४५७७६९), वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप कसबे (७०२०७१५२३०), पोलीस निरीक्षक नवनाथ जगताप (९८५०१५८८१०), पोलीस कर्मचारी नितीन बाबर (७७०९२०८३१८) किंवा शिवा भाऊ पासलकर (९३२६४२५८५८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "तुमचा एक फॉरवर्ड मेसेज एका कुटुंबाला त्यांचा माणूस परत मिळवून देऊ शकतो," असेही आवाहन करण्यात आले आहे.





## रुपेश घुले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कर्मचाऱ्यांचा सन्मान; गृहउपयोगी भेटवस्तूंचे वाटप





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे शहर उपाध्यक्ष तथा नांदेड गावचे माजी उपसरपंच रुपेश घुले पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

वाढदिवसानिमित्त पुणे महानगरपालिका हद्दीतील नांदेड परिसरातील स्वच्छता कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करत गृहउपयोगी भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. याच अनुषंगाने जनसंवाद उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात नगरसेवक काकासाहेब चव्हाण आणि नगरसेविका अनिता इंगळे यांनी परिसरातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या व भावना जाणून घेतल्या. विविध विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली असून सोसायट्यांशी संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सकारात्मक आश्वासन देण्यात आले. रुपेश घुले पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये पुणे महानगरपालिकेचे गटनेते काकासाहेब चव्हाण, नगरसेविका अनिता इंगळे, प्रभाग समिती अध्यक्ष नगरसेवक सचिन मोरे,खडकवासला विधानसभा अध्यक्ष संदीपदादा मते, शिवसेना (ठाकरे गट) चे नेते नितीन वाघ, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष अतुल धावडे, तसेच हेमेंद्र जोशी, जितेंद्र धुमाळ, महेश बजाज यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. यावेळी रुपेश घुले पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानत, आगामी काळातही समाजहिताची व जनसेवेची परंपरा अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमात बोलताना त्यांच्या पत्नीं सौ. रश्मी घुले यांनी, "घुले पाटील परिवाराची समाजसेवेची परंपरा यापुढेही कायम राहील," असा विश्वास व्यक्त केला. सामाजिक बांधिलकी, जनसंपर्क आणि सेवाभाव यांचे दर्शन घडविणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## भारतीय संस्कृती केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही प्रभावी - डॉ. गो. बं. देगलूरकर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय संस्कृती केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही प्रभावी असल्याचे उत्तम उदाहरण इंडोनेशिया या देशावरून दिसून येते. आम्ही धर्माने मुस्लिम असलो. तरी संस्कृतीने हिंदू आहोत,” असे इंडोनेशियाच्या परराष्ट्र मंत्र्यांनी अभिमानाने सांगितल्याचे ज्येष्ठ पुरातत्व तज्ज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी नमूद केले. प्राचीन इंडोनेशियातील हिंदू-बौद्ध संस्कृती, परंपरा आणि राजसत्तेचा इतिहास उलगडणाऱ्या ‘सुवर्णद्वीप : हिंदू बुद्धीस्ट किंग्डम्स् ऑफ एन्शंट इंडोनेशिया’ या पुस्तकाचे प्रकाशन भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट येथे आयसीएचआरचे माजी अध्यक्ष डॉ. ए. पी. जामखेडकर यांच्या हस्ते आणि डेक्कन कॉलेजचे माजी कुलगुरू डॉ. गो. बं.देगलूरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. पुस्तकाच्या लेखिका ऋता उंबरजे आणि सहलेखिका संगीता चाफेकर, तसेच डॉ. अंबरीष खरे, विभा ओक, प्रकाशक पराग पुरंदरे आदि मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रभावाची अनेक उदाहरणे दिली. इंडोनेशियातील सांस्कृतिक जीवनात रामायण आणि महाभारत आजही जिवंत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी महर्षी अगस्तींच्या इंडोनेशियातील कार्याचा तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर आणि माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या इंडोनेशियाशी संबंधित आठवणींचाही उल्लेख केला. डॉ. जामखेडकर यांनी इंडोनेशियातील मंदिरांबद्दल लोकांच्या मनात आजही असलेली पावित्र्याची भावना अधोरेखित केली. इस्लामधर्मीय बहुसंख्य देश असूनही तेथील हिंदू मंदिरांचे संवर्धन आणि जतन करण्यात आले आहे. दक्षिण-पूर्व आशियातील भारतीय संस्कृतीच्या प्रभावाचा अभ्यास करताना काही पाश्चात्त्य इतिहासकारांनी या प्रदेशाला ‘इंडियनाइज्ड स्टेट्स ऑफ साउथ-ईस्ट एशिया’ असे संबोधल्याचा उल्लेख त्यांनी केला. ऋता उंबरजे यांनी जावा आणि बाली बेटांवरील भारतीय संस्कृतीच्या प्रभावाची उदाहरणे दिली. रामायण, महाभारत आणि पुराणकथांतील मूळ भारतीय संकल्पना स्थानिक समाजाने स्वीकारून आपल्या सांस्कृतिक संदर्भात त्यांचे रूपांतर केले. पात्रांची नावे आणि काही तपशील बदलले असले तरी मूळ विचार भारतीय असल्याचे त्यांनी सांगितले. जावा येथील मंदिरांमध्ये रामायणाचे भव्य शिल्परूप दर्शन घडते, असेही त्यांनी नमूद केले.

# पाच लाख वृक्ष लागवडीतून पर्यावरण संवर्धनाला बळ

- पाच लाख वृक्ष लागवडीचा टप्पा केला पार
- सुयश चॅरिटेबल ट्रस्टची मोठी कामगिरी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सुयश चॅरिटेबल ट्रस्टने पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत पाच लाख वृक्ष लागवडीचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. पुणे, नंदुरबार, वाशिम, गडचिरोली या जिल्ह्यांसह राजस्थान आणि आसाम या राज्यांमध्ये विविध ठिकाणी वृक्ष लागवड करून संस्थेने हरित पर्यावरणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला.

सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या या उपक्रमामध्ये स्थानिक नागरिक, स्वयंसेवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी तसेच आदिवासी बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढ्यांना स्वच्छ, निरोगी व समृद्ध पर्यावरण मिळावे या उद्देशाने ही वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात आली.

> “सुयश चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून महाराष्ट्रासह राजस्थान आणि आसाममध्ये हरित संदेश पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. पर्यावरण संवर्धनासाठी गेल्या ५० वर्षांपासून ट्रस्ट सातत्याने कार्यरत असून, आज पाच लाखांहून अधिक वृक्ष लागवडीचा टप्पा गाठणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. आगामी काळातही वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची ही चळवळ अधिक व्यापक करण्याचा आमचा संकल्प आहे.” **– शलाका घैसास, कार्याध्यक्ष, सुयश चॅरिटेबल ट्रस्ट**

वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष लागवडीचे महत्त्व अधिक अधोरेखित होत आहे. याची जाणीव ठेवून सुयश चॅरिटेबल ट्रस्ट गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचे कार्य करत आहे. लागवड केलेल्या रोपांचे संगोपन व संरक्षण यावरही संस्था विशेष भर देत आहे.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास आणि स्मिता घैसास कार्याध्यक्ष शलाका घैसास यांनी या उपक्रमाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, “वृक्ष लागवड ही केवळ मोहीम नसून पर्यावरण रक्षणासाठीची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक आणि प्रभावी होईल.”


## ग्रामपंचायत, लिंगाळी ता, दौंड, जि. पुणे

**B1 पेपर नोटीस - २ सन २०२६-२७**

ग्रामपंचायत लिंगाळी, ता. दौंड जि. पुणे यांच्याकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद) लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषदेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणी कृत ठेकेदारकडून माघविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत लिंगाळी, ता. दौंड जि. पुणे ०९/०६/२०२६ ते १५/०६/२०२६ कालावधीत कामकाझाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजे पर्यन्त पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारावी जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र. ५ पासलकर वसाहत अंतर्गत रस्ता करणे | ३९९८९७/- | ०९/०६/२०२६ ते १५/०६/२०२६ | ०/- | सूट सु. बे. वर्ग ५. |
| २ | वार्ड क्र 5 पासलकर वसाहत अंतर्गत पाणीपुरवठा कामे करणे. | ३४९८७६/- | ०९/०६/२०२६ ते १५/०६/२०२६ | ०/- | सूट सु. बे. वर्ग ५. |
| ३ | पासलकर वसाहत अंतर्गत बंदिस्त गटर करणे व दुरुस्त करणे. | ४९९५४५/- | ०९/०६/२०२६ ते १५/०६/२०२६ | ०/- | सूट सु. बे. वर्ग ५. |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतेही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी करणे या संदर्भात आवश्यक त्या अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) जिल्हा परिषदेकडील रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ची प्रत जोडण्यात यावी. ४) जी. एस. टी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट ची प्रत जोडण्यात यावी. ५) पॅन कार्ड ची प्रत जोडण्यात यावी. ६) आधार कार्ड ची प्रत जोडण्यात यावी. ७) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ८) इसारा रक्कम ग्रामपंचायत नावे धनादेश डी. डी. जोडण्यात यावा. ९) सी. ए. कडील बीड कपॅसिटी दाखला जोडण्यात यावा.

ग्रामसेवक सरपंच

ग्रामपंचायत लिंगाळी, ता, दौंड, जि, पुणे

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. ०९ जून २०२६








## थोडक्यात पण महत्वाचे



### समर्थ पॅनेलचा दणदणीत विजय

पुणे (आरंभ पर्व) : अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीची मतमोजणी पूर्ण झाली असून, या निवडणुकीत मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनेलने एकहाती विजय मिळवत पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. पॅनेलमधील सर्व उमेदवार विजयी झाल्याने चित्रपट क्षेत्रातील सदस्यांनी समर्थ पॅनेलच्या नेतृत्वावर आणि कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केल्याचे स्पष्ट झाले आहे. महामंडळाच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली होती. त्यापैकी ३ जागा बिनविरोध निवडून आल्याने उर्वरित १४ जागांसाठी मतदान घेण्यात आले. या १४ जागांवर समर्थ पॅनेलने सर्व जागा जिंकत दणदणीत विजयाची नोंद केली. मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढविणाऱ्या समर्थ पॅनेलमध्ये सुनील महाजन, दीपक कदम, अजित शिरोळे, राज काझी, सुशांत शेलार, धनाजी यमकर, सुभाष नकाशे, शरद चव्हाण, प्रवीण पाटील, चैत्राली डोंगरे, रवींद्र गावडे, गणेश गारगोटे, विकास तोरणे या सर्व उमेदवारांचा समावेश होता. या सर्व उमेदवारांनी विजय मिळवत समर्थ पॅनेलचा संपूर्ण पॅनेल निवडून आणला. या निकालामुळे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळात पुढील पाच वर्षांसाठी समर्थ पॅनेलच्या नेतृत्वाखालील कार्यकारिणीकडे सूत्रे जाणार असून, महामंडळाच्या विकासासाठी आणि चित्रपट क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी नव्या जोमाने काम करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.



### अनुकरणीय गणेशोत्सवासाठी समाजोपयोगी उपक्रमांची गरज : मंदार लवाटे

पुणे (आरंभ पर्व) : गणेशोत्सव ही केवळ धार्मिक परंपरा नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. पेशव्यांच्या काळापासून ते विविध समाजघटकांपर्यंत गणेशोत्सव साजरा होत आला आहे. प्लेगची साथ असो वा पानशेत धरण फुटीचे संकट, गणेशोत्सव कधीच थांबला नाही आणि भविष्यातही त्यात खंड पडणार नाही. अनुकरणीय गणेशोत्सवासाठी समाजोपयोगी उपक्रमांची गरज असते असे प्रतिपादन इतिहासकार, लेखक आणि संशोधक मंदार लवाटे यांनी केले. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या पर्यावरण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'रोटरी माय सिटी माय प्रॉमिस' या शिस्त व पर्यावरणपूरक वर्तन बदल अभियानाच्या तसेच जय गणेश व्यासपीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'अनुकरणीय गणेशोत्सव २०२६ – मार्गदर्शन शिबिर' मध्ये ते बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. मिलिंद भोई, संगणकतज्ज्ञ व लेखक डॉ. दीपक शिकारपूर, चंद्रशेखर भेडा, मनोज धारप, शैलेन्द्र गाडेकर, विष्णू भेडा, पियुष शाह आदी मान्यवर उपस्थित होते. लवाटे म्हणाले, "गणेशोत्सवात भक्तीची सर्वात मोठी लाट अनुभवायला मिळते. आषाढ महिन्यात सुरू झालेली ही भक्तीची भावना भाद्रपद पौर्णिमेच्या सुमारास सर्वोच्च बिंदूला पोहोचते. पुण्यातील गणेशोत्सवाचा इतिहास जुना असल्याचे अनेक पुरावे उपलब्ध आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वीही विविध ठिकाणी थाटामाटात गणेशोत्सव साजरा केला जात होता. गणेशोत्सव मंडळांनी नेहमीच समाजोपयोगी कार्यात योगदान दिले आहे. भविष्यातही ही परंपरा अधिक व्यापक व्हावी."

### फादर्स डे निमित्त वडिलांसाठी उपयुक्त आणि आकर्षक भेटवस्तूंचा खास संग्रह



पुणे (आरंभ पर्व) : वडिलांसाठी योग्य भेटवस्तू निवडणे अनेकदा आव्हानात्मक ठरते. ते सहसा स्वतःसाठी काही मागत नाहीत आणि आपल्या आवडीच्या वस्तूंनाच प्राधान्य देतात. अशा वेळी फॅशनशी संबंधित उपयुक्त भेटवस्तू हा विचारपूर्वक आणि उपयोगी पर्याय ठरू शकतो. याच पार्श्वभूमीवर नायका फॅशनने फादर्स डे निमित्त पुरुषांसाठी वस्त्रे, पादत्राणे आणि पूरक वस्तूंचा विशेष संग्रह सादर केला आहे. काही वस्तू अशा असतात ज्या काळानुसार बदलणाऱ्या प्रवाहांपासून दूर राहून कायम लोकप्रिय ठरतात. उत्तम बसणारे शर्ट, पारंपरिक शैलीतील अर्धबाह्यांचे टी-शर्ट तसेच आरामदायी तागाच्या कापडातील वस्त्रे कोणत्याही व्यक्तीच्या कपाटात सहज स्थान मिळवतात.

# समाविष्ट गावांच्या करप्रश्नी निर्णय कधी?

## नागरिकांची प्रतीक्षा कायम : आचारसंहिता संपली; महापौरांच्या बैठकीला जवळपास तीन महिने पूर्ण होण्याच्या मार्गावर

- नागरिकांना दिलासादायक निर्णयाची अपेक्षा



रोखठोक विथ लक्ष्मण साबळे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमधील मालमत्ता कर आकारणीचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असून नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. कर आकारणीतील विसंगती, वाढीव करभार, पायाभूत सुविधांचा अभाव आणि ग्रामपंचायत क्षेत्रातून महानगरपालिका क्षेत्रात समावेश झाल्यानंतर लागू करण्यात आलेल्या कर प्रणालीबाबत नागरिक सातत्याने आक्षेप घेत आहेत.

16 मार्च रोजी महापौर मंजुषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत नगरसेवक काकासाहेब चव्हाण, नगरसेवक सुभाष नाणेकर,नगरसेविका अनिता इंगळे, धनश्री कोल्हे ,तसेच समाविष्ट गावांतील इतर लोकप्रतिनिधी, नागरिक आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत निवासी व बिगरनिवासी मालमत्तांवरील कर आकारणी, शास्ती, दंड, व्याज तसेच पायाभूत सुविधांच्या तुलनेत आकारण्यात येणाऱ्या कराबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली होती. बैठकीदरम्यान समाविष्ट गावांच्या करप्रश्नी संबंधित सभासदांची समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. नागरिकांच्या सूचना, हरकती आणि मागण्या विचारात घेऊन प्रशासनाशी चर्चा करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

मात्र, या बैठकीला आता जवळपास तीन महिने पूर्ण होण्याच्या मार्गावर असतानाही अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम कायम आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लागू असलेली आचारसंहिता आता संपुष्टात आली आहे. त्यामुळे समाविष्ट गावांतील हजारो मालमत्ताधारकांचे लक्ष प्रशासन, स्थायी समिती आणि मुख्य सभेच्या आगामी निर्णयाकडे लागले असून, कर आकारणीच्या प्रश्नावर लवकरात लवकर तोडगा निघावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. याबाबत खडकवासला विधानसभा आ.भीमराव तापकीर यांनीही समाविष्ट गावातील टॅक्स विषय विधानसभेमध्ये मांडला आहे. मात्र पुणे महानगरपालिकेकडून मुख्य सभेमध्ये हा ठराव पास होऊन शासनाकडे गेल्यानंतर यावर ठोस निर्णय घेतला जाऊ शकतो.

समाविष्ट गावातील अनेक नागरिक व व्यापारी यांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

> "समाविष्ट गावांच्या टॅक्सबाबत आम्ही महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा करत आहोत. आता तरी या विषयावर ठोस निर्णय व्हायला हवा. याबाबत स्थायी समितीकडे आम्ही विषय मांडला असून नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत."
> **– काकासाहेब चव्हाण गटनेते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)**

> "बैठकांवर बैठका होत आहेत. चर्चेचा सिलसिला सुरू आहे; मात्र नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. समाविष्ट गावांतील नागरिकांची मागणी योग्य असून त्यांना न्याय मिळावा आणि कर आकारणीबाबत दिलासा देणारा निर्णय तातडीने घ्यावा."
> **– रुपेश घुले पाटील शहर उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)**

> "समाविष्ट गावांचा टॅक्स कमी व्हावा यासाठी मी महानगरपालिकेला पत्र दिले होते. त्यानंतरच मीटिंग आयोजित करण्यात आली. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात चर्चा सुरू असून लवकरच या विषयावर सकारात्मक निर्णय होईल."
> **– सुभाष नाणेकर नगरसेवक**

> "सध्या एसआरए, जनगणना आणि इतर शासकीय कामे सुरू आहेत. त्यामुळे काही प्रशासकीय प्रक्रिया सुरू आहेत. या महिन्याच्या अखेरीपर्यंत संबंधित प्रस्ताव पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. त्यानंतर पुढील मुख्य सभेमध्ये हा विषय चर्चेसाठी आणला जाईल. महानगरपालिका प्रशासन या विषयाबाबत सकारात्मक असून नागरिकांना न्याय मिळेल, या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे."
> **– रवी पवार, आयुक्त (कर आकारणी), पुणे महानगरपालिका**

> गेल्या अनेक वर्षापासून समाविष्ट गावातील नागरिकांवर अन्याय होत आहे .शासनाने व पुणे महानगरपालिकेने महिन्यामध्ये ठोस निर्णय घ्यावा अन्यथा शिवसेना स्टाईने आंदोलन करू... ही गळचेपी यापुढे सहन केली जाणार नाही.
> **- शिवाजीराव मते, विधानसभा प्रमुख, शिवसेना( उ.बा.ठा)**

## सदभावना वृद्धाश्रमाला पालकांची गरज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आपल्याला आईची गरज आहे. वृद्धाश्रम ही केवळ भारतीय संस्कृतीच नाही, तर आजच्या कलियुगाची गरज आहे. दुर्दैवाने, संयुक्त कुटुंब पद्धती मोडीत निघत असल्यामुळे अनेक लोक असहाय्य होत आहेत. गेल्या दहा वर्षांपासून राजकोटमध्ये 'विनुभाई बचूभाई नगरेचा परिसर' सदभावना वृद्धाश्रम चालवले जात आहे. या वृद्धाश्रमात जात किंवा धर्माचा कोणताही भेदभाव न करता, गरजू वृद्धांना नियमांनुसार आणि संस्थेच्या प्रवेश मर्यादेत राहून आदराने दाखल करून घेतले जाते आणि सर्व सुविधा विनामूल्य पुरवल्या जातात. वृद्धाश्रमात दाखल होणाऱ्या गरजू वृद्धांकडून कोणतेही शुल्क, आकार किंवा वर्गणी घेतली जात नाही. वृद्धांना सर्व सुविधा विनामूल्य पुरवल्या जातात. ५०० कोटी रुपये खर्च करून, १४०० खोल्यांमध्ये ५००० निराधार, आजारी आणि अंथरुणाला खिळलेल्या वृद्धांची सोय केली जाईल. जगातील सर्वात मोठे मोफत सदभावना वृद्धाश्रम, विनूभाई बाचूभाई नगरेचा येथील नवीन परिसरात, निराधार, आजारी आणि अंथरुणाला खिळलेल्या



वृद्धांना आयुष्यभर पूर्णपणे मोफत राहण्याची सोय उपलब्ध करून दिली जाईल. यामध्ये ७ टॉवर्समधील प्रत्येक टॉवरमध्ये ११ मजले असतील, जेणेकरून प्रत्येक व्यक्तीला पुरेशी जागा आणि काळजी मिळेल. तसेच, जैन समाजातील वृद्धांसाठी एक संपूर्ण टॉवर वेगळा बनवण्यात आला आहे, जिथे एक मंदिरही बांधण्यात आले आहे. "विनूभाई बाचूभाई नगरेचा परिसर" येथील सदभावना वृद्धाश्रम २० लाख चौरस फूट बांधकामाचे आहे. सदभावना वृद्धाश्रमाबद्दल बोलायचे झाल्यास, सदभावना वृद्धाश्रम हे एक विशेष वृद्धाश्रम आहे, जे निःसंतान, निराधार, अंथरुणाला खिळलेल्या आणि कर्करोग व कोमात असलेल्या वृद्ध व्यक्तींना सन्मानाने आणि निष्ठेने आयुष्यभर मोफत सेवा देण्यासाठी समर्पित आहे.

## पनीर गायब झालं आणि प्रश्न उभा राहिला...

**(दै. आरंभ पर्व)**

**कालपर्यंत हॉटेलमध्ये गेल्यावर पनीर चिल्ली, पनीर मसाला, पनीर तडका, कढई पनीर अशा पदार्थांची रेलचेल होती. पनीरशिवाय मेन्यू अपूर्ण वाटायचा. पण आज अचानक अनेक ठिकाणी हे पदार्थ गायब दिसत आहेत. कारण विचारलं तर एकच उत्तर मिळतं "पनीरचा शॉर्टेज आहे!"**




कारण हा तुटवडा फक्त पनीरपुरता मर्यादित नाही. काही ठिकाणी मसाला दूध दिसत नाही, रबडीचे स्टॉल ओस पडले आहेत, बासुंदी विक्रेतेही शांत आहेत. कालपर्यंत भरभराटीत असलेले काही व्यवसाय अचानक मंदावलेले दिसत आहेत.

अन्न व औषध प्रशासनाने भेसळीविरोधात मोहीम तीव्र केल्यानंतर राज्यभरातून बोगस पनीर, कृत्रिम दूध आणि भेसळयुक्त पदार्थांविरोधातील कारवायांच्या बातम्या समोर येऊ लागल्या. तपासणी पथके सक्रिय झाली, नमुने तपासले जाऊ लागले आणि अनेकांच्या झोपेचे खोबरे झाले.

यामुळेच आता ग्राहकांच्या मनात एक वेगळाच प्रश्न निर्माण होत आहे. जे पदार्थ कालपर्यंत मुबलक प्रमाणात उपलब्ध होते, ते आज अचानक दुर्मिळ का झाले?

खरे पनीर बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात दूध लागते. त्याचा खर्चही जास्त असतो. पण बाजारात अनेकदा अतिशय कमी दरात पनीर उपलब्ध होत होते. काही ठिकाणी ते खऱ्या दुधापासून बनलेले होते, तर काही ठिकाणी त्याच्या गुणवत्तेबद्दल नेहमीच प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते.

आज कारवाई सुरू होताच जर स्वस्त पनीरचा पुरवठा थांबत असेल, तर ग्राहकांच्या मनात संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे हा प्रश्न फक्त चवीचा किंवा पैशांचा नाही, तर आरोग्याचा आहे.

कारण भेसळयुक्त पदार्थांचा परिणाम शरीरावर हळूहळू होतो. ग्राहक पैसे देऊन पौष्टिक पदार्थ खात असल्याचा समज करून घेतो; पण प्रत्यक्षात त्याच्या ताटात काय वाढले जात आहे, हे त्याला माहीत नसते.

यामुळेच भेसळीविरोधातील कारवाई ही केवळ सरकारी मोहीम नाही, तर ग्राहकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्याची लढाई आहे.

अर्थात, प्रत्येक हॉटेल किंवा प्रत्येक विक्रेता भेसळ करतो असे अजिबात नाही. अनेक जण प्रामाणिकपणे व्यवसाय करतात. दर्जेदार दूध, दर्जेदार पनीर आणि शुद्ध पदार्थ ग्राहकांना देण्यासाठी मेहनत घेतात.


पण कारवाई सुरू होताच बाजारातील काही पदार्थ अचानक गायब होणे, हा निव्वळ योगायोग मानणेही कठीण आहे.

आज ग्राहक म्हणून आपण स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

जर सर्व काही शुद्ध आणि पारदर्शक होते, तर मग कारवाईची चाहूल लागताच काहींची दुकाने आणि काही पदार्थ अचानक का गायब झाले?

कदाचित याचे उत्तर पुढील काही दिवसांत मिळेल.

पण तोपर्यंत एक गोष्ट नक्की : मेन्यूकार्डमधून पनीर गायब होण्यापेक्षा, ग्राहकांच्या मनात निर्माण झालेला संशय जास्त मोठा आहे!



## शिवणे परिसरात रस्त्यावर कचऱ्याचे साम्राज्य

### बेजबाबदारपणामुळे स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर

**कोंढवे धावडे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेकडून घराघरांतून कचरा संकलनासाठी घंटागाड्यांची व्यवस्था करण्यात आलेली असतानाही शिवणे परिसरात काही नागरिकांकडून सर्रासपणे रस्त्यावर व सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकला जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे मुख्य रस्ते व परिसरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचून अस्वच्छता वाढत आहे. महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून नियमित कचरा संकलन केले जात असतानाही काही नागरिक नियमांचे पालन करत नसल्याने परिसराचे सौंदर्य आणि आरोग्य धोक्यात येत आहे. विशेषतः मुख्य रस्त्यालगत व मोकळ्या जागांमध्ये प्लास्टिक, घरगुती कचरा व इतर टाकाऊ वस्तू फेकल्या जात असल्याने दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत नाराजी व्यक्त करत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच पुणे महानगरपालिकेने अशा कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करून परिसरात सीसीटीव्ही व जनजागृती मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.

> "घंटागाडीची सुविधा उपलब्ध असतानाही काही जणांकडून रस्त्यावर कचरा टाकला जात आहे. स्वच्छ परिसर ठेवण्यासाठी नागरिकांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. आणखी घंटागाड्या वाढवण्यात येतील. कचरा मुक्त प्रभाग करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.
> **- सुभाष नाणेकर, स्थानिक नगरसेवक**

## शिवराज्याभिषेक दिनी सोमेश्वरवाडीत रक्तदानाचा विक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"स्वराज्याचा सन्मान राखुया, चला रक्तदान करूया" या प्रेरणादायी संदेशासह छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सोमेश्वरवाडी,पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात तब्बल १२०३ रक्तदात्यांनी रक्तदान करून विक्रमी सहभाग नोंदविला. मानवतेची सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे आयोजन सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट, श्री विठ्ठल सेवा मंडळ (एक गाव एक गणपती), सोमेश्वरवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच नगरसेवक सनी विनायक निम्हण यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते. "नात रक्ताचं शिवभक्तांचं"



या संकल्पनेवर आधारित या रक्तदान महोत्सवाचे यंदाचे सलग सहावे वर्ष होते. शिवराज्याभिषेक दिनाच्या पावन पर्वावर आयोजित या उपक्रमाला युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिणामी, १२०३ रक्तदात्यांच्या सहभागामुळे हा उपक्रम परिसरातील सर्वात मोठ्या सामाजिक उपक्रमांपैकी एक ठरला. "तेच ठिकाण, तोच दिन पावन... रक्तदानातून घडवू नवे जीवन!" या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी अधोरेखित केली. रक्ताच्या एका पिशवीमुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते, या जाणीवेने नागरिकांनी रक्तदानासाठी मोठी गर्दी केली.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकर्ते, स्वयंसेवक, वैद्यकीय पथके, विविध सामाजिक संस्था तसेच सर्व रक्तदात्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे हा सामाजिक उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी नगरसेवक सनी निम्हण म्हणाले, "रक्तदान हे केवळ दान नसून एखाद्याच्या जीवनाला नवसंजीवनी देणारे श्रेष्ठ कार्य आहे. शिवराज्याभिषेक दिनासारख्या प्रेरणादायी दिवशी नागरिकांनी दाखविलेला सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी अत्यंत कौतुकास्पद आहे. रक्तदानातून आपण केवळ रक्त देत नाही, तर एखाद्या कुटुंबाला आशेचा किरण देत असतो. भविष्यातही असे सामाजिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येतील." शिवराज्याभिषेक दिनी झालेल्या या रक्तदान महोत्सवामुळे सामाजिक सेवेला नवी उंची मिळाली असून, नागरिकांच्या विक्रमी सहभागातून मानवतेचा संदेश अधिक दृढ झाला आहे.

## मुखाईवनमध्ये ३०० देशी वृक्षांचे वृक्षारोपण

**शिरूर (दै. आरंभ पर्व)**

पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेच्या जतनासाठी मुखाईवन येथे ३०० देशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. वनराई संस्था, इनव्हॅलिअर कंपनी आणि मुखाई ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विविध देशी प्रजातींच्या वृक्षांसह फळझाडांची लागवड करण्यात आली. मुखाईवन प्रकल्पांतर्गत यापूर्वीही मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले असून, या मोहिमेनंतर परिसरातील एकूण वृक्षसंख्या २,५०० हून अधिक झाली आहे. लावण्यात आलेल्या वृक्षांचे संगोपन, संरक्षण आणि



देखभाल नियोजनबद्ध पद्धतीने केली जात असल्याने परिसरातील हिरवाईत लक्षणीय वाढ झाली आहे. या उपक्रमामुळे स्थानिक जैवविविधतेला चालना मिळत असून विविध पक्षी, फुलपाखरे, कीटक आणि इतर वन्यजीवांसाठी नैसर्गिक अधिवास निर्माण होत आहे. वाढते तापमान नियंत्रित ठेवणे, मृदा संवर्धन, भूजल पातळी सुधारणे आणि हवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### हर घर योद्धा स्वसंरक्षण शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : युवक आणि युवतींनी स्वसंरक्षणाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम व्हावे, या उद्देशाने हिंदु जनजागृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय 'हर घर योद्धा' स्वसंरक्षण शिबिरांना पुणे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १९ एप्रिलपासून सुरू झालेल्या या अभियानांतर्गत नायगाव, पेठ, लोणी काळभोर, कोलवडी, थेऊर, पांडवदंड, दहिटणे, शिरवळ, भोर, तळेगाव दाभाडे आणि राजगुरूनगर येथे शिबिरे पार पडली. या शिबिरांमध्ये एकूण २४४ युवक व युवतींनी सहभाग घेतला. त्यापैकी १४४ जणांनी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याने त्यांना प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. स्वसंरक्षणाच्या विविध तंत्रांसह मानसिक सक्षमीकरण, प्रसंगावधान आणि संकटसमयी योग्य निर्णय घेण्याचे प्रशिक्षण शिबिरात देण्यात आले. प्रशिक्षण घेतलेल्या सहभागींकडूनही सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. कु. श्रावणी माळवे यांनी, "या शिबिरामुळे आत्मविश्वास वाढला असून कोणत्याही संकटाला धैर्याने सामोरे जाण्याची तयारी झाली", असे सांगितले. तर नायगाव येथील सौ. सुप्रिया चौधरी यांनी, "अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची मानसिकता आणि मनाने अधिक कणखर होण्याची प्रेरणा या शिबिरातून मिळाली", असे मत व्यक्त केले.

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सनी निम्हण यांचा पुढाकार



पुणे (आरंभ पर्व) : औंध-बोपोडी परिसरातील शाळांजवळील चौक अधिक सुरक्षित, सुबक आणि वाहतूक पूरक करण्यासाठी पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक सनी विनायक निम्हण यांनी पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागाकडे निवेदन सादर केले आहे. प्रभाग क्रमांक ८ड अंतर्गत गणेशखिंड रोड परिसरातील विविध शाळांजवळील चौकांचा वाहतूकदृष्ट्या विकास करण्याची मागणी त्यांनी केली आहे. मुख्य अभियंता, पथ विभाग यांना दिलेल्या निवेदनात निम्हण यांनी नमूद केले आहे की, केंद्रीय विद्यालय, डी.ए.व्ही पब्लिक स्कूल आणि स्पायसर स्कूल या नामांकित शैक्षणिक संस्था मुख्य वर्दळीच्या रस्त्यालगत कार्यरत आहेत. शाळा सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत विद्यार्थ्यांसह पालकांच्या वाहनांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने वाहतुकीवर ताण निर्माण होतो. परिणामी विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना अनेकदा धोकादायक परिस्थितीचा सामना करावा लागतो. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत संबंधित चौकांमध्ये 'स्कूल झोन' दर्शविणारे फलक, झेब्रा क्रॉसिंग, स्पीड ब्रेकर, दिशादर्शक चिन्हे आणि स्पष्ट रस्ता सुरक्षा मार्गदर्शन व्यवस्था उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय शाळा परिसरात विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची माहिती देणारी आणि त्यांचे लक्ष वेधून घेणारी आकर्षक व प्रबोधनात्मक भिंतीचित्रे (वॉल पेंटिंग) रंगविण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे.

### अखेर १२ गावांना दिवसा वीजपुरवठा

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : थेऊर, नायगाव व हिंगणगाव कृषी (एजी) फिडरअंतर्गत येणाऱ्या १२ गावांना अखेर मंगळवारी सकाळी १० वाजल्यापासून दिवसा वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज हिरामण काकडे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागातील कृषी फिडरवर रात्रीच्या वेळी वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रात्रीच्या वेळी शेतीपंप चालवण्यासाठी शेतात जावे लागत असल्याने शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. परिसरात बिबट्यांच्या वावरामुळे पाळीव प्राण्यांवर हल्ल्यांच्या घटनाही घडत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी दिवसा वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी केली होती. यासाठी सभापती युवराज काकडे यांनी आमदार ज्ञानेश्वर कटके तसेच Maharashtra State Electricity Distribution Company Limited (महावितरण) यांच्याकडे निवेदने देऊन सातत्याने पाठपुरावा केला. महावितरणने याची दखल घेत सकारात्मक निर्णय घेतला असून थेऊर एजी, नायगाव एजी आणि हिंगणगाव एजी या तीन कृषी फिडरवरील वीजपुरवठा आज सकाळी १० वाजल्यापासून दिवसा सुरू करण्यात आला आहे. यामुळे थेऊर, कोलवडी-साष्टे, नायगाव, पेठगाव, कोरेगावमुळ, भवरापूर, अष्टापूर, खामगाव टेक, टिळेकरवाडी, शिरसवडी, बिवरी आणि नायगाव या १२ गावांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. खरीप हंगामाच्या पूर्वसंध्येला दिवसा वीज उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांना शेतीपंप चालवणे अधिक सोयीचे होणार आहे. या निर्णयाबद्दल परिसरातील नागरिक आणि शेतकरी बांधवांनी आमदार ज्ञानेश्वर कटके, सभापती युवराज काकडे आणि महावितरण प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.

### जाणवंमुक्त जाणिवेची संघटना म्हणजे साहित्यसम्राट – श्रीपाल सबनीस

उरुळी कांचन (आरंभ पर्व) : "साहित्यसम्राटचा चौदा वर्षांचा प्रवास हा बागेतील गवतापासून ते स्मशानभूमीपर्यंत, दवाखाना, विद्यापीठ, महापालिका, शाळा-कॉलेज आणि पदरस्त्यांमधून गेलेला समाजाभिमुख साहित्यिक सहवास आहे. कलावंतांची प्रतिभा ही सर्वकाळी आणि सर्वस्थानी समाजोपयोगी ठरते; म्हणूनच साहित्यसम्राटने अनेक प्रतिभावंत कवी-साहित्यिक घडवले," असे प्रतिपादन ज्येष्ठ विवेकवादी विचारवंत श्रीपाल सबनीस यांनी केले. हडपसर येथील स्वर्गीय विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृह येथे जागतिक पर्यावरण दिन आणि शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित साहित्य सम्राट पुणे संस्थेच्या २२५ व्या राज्यस्तरीय संमेलनात ते अध्यक्षीय भाषण करत होते. संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमास कवयित्री ललिता सबनीस, ज्येष्ठ साहित्यिक वि. ग. सातपुते, सूर्यकांत वैद्य, चित्रपट निर्माते संजय सिंगलवार, पुणे विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ. सुनील लोखंडे, दादासाहेब सोनवणे, उद्योजक संदीप रणदिवे, गझलकार मसूद पटेल आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा संस्थेच्या आजीव सभासदांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# रात्रपाळीसाठी घंटागाडीची मागणी

## नागरिकांच्या समस्या जाणून घेत ॲड. प्रसन्नदादा जगताप यांची प्रत्यक्ष पाहणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
प्रभाग क्रमांक २८ मधील पु. ल. देशपांडे उद्यान आरोग्य कोठी व पर्वती केंद्र आरोग्य कोठी येथे माजी उपमहापौर नगरसेवक ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी भेट देऊन तेथील सेवक, आरोग्य कर्मचारी तसेच पुणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांशी सविस्तर संवाद साधला. यावेळी त्यांच्या दैनंदिन कामकाजातील अडचणी, उपलब्ध सुविधांची स्थिती तसेच नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा कशा पद्धतीने देता येतील याबाबत चर्चा करण्यात आली. आरोग्य व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि परिणामकारक करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या सूचना व समस्या गांभीर्याने ऐकून घेण्यात आल्या.

त्यानंतर नवश्या मारुती परिसरातील विविध सोसायट्यांमध्ये जाऊन ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी नागरिकांशी थेट संवाद साधला. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, ड्रेनेज, सार्वजनिक सुविधा, आरोग्य सेवा आणि परिसर विकासाशी संबंधित विविध प्रश्न नागरिकांनी मांडले. प्रत्येक समस्या गांभीर्याने ऐकून संबंधित विभागांशी समन्वय साधत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लावण्याचाही प्रयत्न करण्यात आला. यावेळी परिसरातील स्वच्छतेच्या प्रश्नावर विशेष चर्चा झाली. नागरिकांच्या मागणीची दखल घेत ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी पुणे महानगरपालिकेकडे रात्रपाळीसाठी कचरा संकलन करणारी घंटागाडी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. रात्रीच्या वेळी कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होण्यासाठी ही सुविधा आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ॲड. प्रसन्नदादा जगताप म्हणाले, "लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या प्रत्येक अडचणीपर्यंत पोहोचून त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्या वेळेत सोडविणे हीच आपली प्राथमिक जबाबदारी आहे. विकासकामांसोबतच सक्षम आरोग्य व्यवस्था, प्रभावी स्वच्छता यंत्रणा आणि नागरिककेंद्री प्रशासन उभारण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार आहोत."

## पीएच. डी. विषय देशासमोरील आव्हांनासाठी उपयुक्त

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनमधील (बीएनसीए) संशोधन विषय हे आपल्या देशासमोरील विविध आव्हानांना तोंड द्यायला नक्कीच उपयोगी ठरतील. तसेच संशोधन केंद्राने केलेल्या मार्गदर्शनानुसार तिथे पदवी घेतलेले २५ पीएच.डी. धारक हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उद्दीष्टानुसार घडले आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे यांनी सांगितले. त्यांच्या उपस्थितीत २५ डॉक्टरेट मिळवलेल्यांच्या सारांश पुस्तकाचे प्रकाशन झाले. २०१२ ते २०२५ या १३ वर्षांमध्ये बीएनसीए संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांनी २५ पीएच.डी. धारक घडवले. त्यांच्या उपस्थितीत हा स्नेहमेळावा बीएनसीएच्या आवारातील आयएसडीएस सभागृहात 'जागतिक पर्यावरण दिनी' नुकताच संपन्न झाला.

## आमदार काळेंनी दिले माजी आ. दिलीप मोहितेंना आव्हान

- एमआयडीसीच्या औद्योगिक शांततेला बाधा आणणारे पत्र केले जाहीर

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**
एमआयडीसीच्या औद्योगिक शांततेला बाधा आणणारे, तसेच चाकण परिसरातील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दारात होणारी बेकायदेशीर आंदोलने आणि कंत्राट व्यवसायातून सुरू असलेली खंडणीखोरी हे मुद्दे राज्याच्या औद्योगिक प्रतिमेशी आणि लाखो कामगारांच्या रोजगाराशी संबंधित असल्याने शासनाने याची तातडीने व गंभीर दखल घेतली पाहिजे, अशी मागणी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असून आपले मूळ पत्र स्वतः माध्यमांसमोर खेड-आळंदी मतदारसंघाचे आमदार बाबाजी काळे यांनी जाहीर केले. मागील महिन्यात आमदार काळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात वस्तुस्थिती कथन केली होती. या पत्रावरून खेड तालुक्यातील राजकीय आणि चाकण एमआयडीसी औद्योगिक वर्तुळात मोठी खळबळ उडालेली असताना, काळे यांनी माध्यमांशी संवाद साधत पत्रातील सर्व आरोप पूर्णपणे सत्य आणि येथील खरी 'वस्तुस्थिती' असल्याचा पुनरुच्चार केला. तसेच, या प्रकरणावरून माजी आमदार दिलीप मोहिते यांनी केलेल्या टिकेला उत्तर देताना, आमदार बाबाजी काळेंनी त्यांना "या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीला कायदेशीरपणे सामोरे जा" असे थेट आव्हान दिले आहे.

आमदार बाबाजी काळे यांनी औद्योगिक क्षेत्रातील अशांतता याबाबत घेतलेली आक्रमक भूमिका घेत स्पष्ट करत सांगितले की, चाकण औद्योगिक क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांना कशा प्रकारे धमकावले जात आहे आणि यात स्थानिक माजी आमदार यांचे बगलबच्चे सिंडिकेटचे कसे संगनमत आहे, या सर्व बाबी पूर्णपणे सत्य आहेत. औद्योगिक क्षेत्रातील शांतता आणि राज्याची परकीय गुंतवणुकीची प्रतिमा टिकवण्यासाठी शासनाने या तक्रारीची दखल घेऊन दोषींवर तातडीने गुन्हा नोंदवणे आणि या गुन्हेगारी सिंडिकेटची उच्चस्तरीय चौकशी करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच आमदार काळे यांनी माजी आमदार दिलीप मोहितेंना आव्हान दिले आहे की, जर तुम्ही निष्पाप असाल तर या शासकीय आणि न्यायालयीन चौकशीला घाबरू नये आणि यास थेट सामोरे जावे. याबाबत यापुर्वी मी पत्र दिलेली असून विधानसभेत देखील प्रश्न उपस्थित केला आहे याचा पाठपुरावा देखील मी करणार आहे, असे आमदार काळे यांनी स्पष्ट केले आहे.



## मॅरिएट इंटरनॅशनल आणि सीजी हॉस्पिटॅलिटी ग्लोबल यांच्यात मल्टीयुनिट करार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
मॅरिएट इंटरनॅशनलने दक्षिण आशियामध्ये तीन हॉटेल्स सुरू करण्यासाठी सीजी हॉस्पिटॅलिटी ग्लोबल यांच्यासोबत महत्त्वपूर्ण करार केला आहे. या करारामुळे नेपाळ आणि भारतातील प्रमुख शहरी,आर्थिक आणि पर्यटन स्थळांवर मॅरिएटचे लक्झरी आणि प्रिमियम हॉटेल ब्रँडस सादर केले जातील. 2031 पर्यंत सुरू होण्याची अपेक्षा असलेली आणि कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये 450 खोल्यांची भर घालणारी द रिट्झ - कार्लटन काठमांडू, द वेस्टीन काठमांडू आणि मॅरिएट हॉटेल सिलिगुडी ही हॉटेल्स प्रवासी आणि रहिवाश्यांसाठी सेवा देण्यास सज्ज असतील.

## शेतकऱ्यांच्या सामंजस्यातून १.५ किमीचा नवीन शेतरस्ता तयार




**दौंड (दै. आरंभ पर्व)**
मोजे गार येथील शेतकऱ्यांनी शेतात ये-जा करण्यासाठी रस्ता नसल्याने नवीन शेतरस्त्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत महसूल प्रशासनाने पुढाकार घेत मध्यस्थी केल्यामुळे अखेर शेतकऱ्यांच्या सामंजस्यातून नवीन रस्ता तयार करण्यात यश आले.

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरू केलेल्या 'श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियान' अंतर्गत रस्त्यांचे वाद प्राधान्याने सोडवण्याचे आदेश महसूल यंत्रणेला देण्यात आले आहेत. त्यानुसार या प्रकरणाची दखल घेण्यात आली.

सदर प्रकरण दौंडचे तहसीलदार अरुण शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार डॉ. तुषार बोरकर यांच्याकडे वर्ग करण्यात आले. त्यांनी दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन चर्चा व समन्वयातून मार्ग काढण्याचे आवाहन केले. यास प्रतिसाद देत दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांनी परस्पर सामंजस्यातून सर्वांच्या सोयीचा निर्णय घेत नवीन रस्ता तयार करण्यास सहमती दर्शवली. या उपक्रमात निवगुणे, येडे, रणसिंग, सुर्वे, दगडे, कोळेकर, शेडगे, बानगुडे यांसह इतर ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

या प्रयत्नांतून सुमारे १ ते १.५ किलोमीटर लांबीचा शेतरस्ता तयार करण्यात आला आहे.

दौंड उपविभागाचे अधिकारी रेवणनाथ लबडे यांनी संबंधित शेतकऱ्यांचे कौतुक करत भविष्यातही अशा प्रकारचे वाद गावपातळीवरच सामंजस्याने सोडवावेत, असे आवाहन केले.

## "Ai+ Smartphone ने लाँच खुल्या चाचणीत रूपांतरित केला




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
भारतीय स्मार्टफोन उद्योगातील अशा प्रकारच्या पहिल्याच उपक्रमात, Ai+ Smartphone ने आज घोषित केले की, विश्वासू ग्राहकांसाठी विक्री सुरू करण्यापूर्वीच ते संपूर्ण भारतातील परीक्षक, कंटेंट निर्माते, पत्रकार आणि तंत्रज्ञान समुदायातील सदस्यांना आपले आगामी Nova2 Neo आणि Nova2 Pro स्मार्टफोन पाठवणार आहे — कोणत्याही निर्बंधांशिवाय उपकरणांचे मूल्यमापन व परीक्षण करण्यासाठी. लाँच कार्यक्रमांभोवती उभारलेल्या या उद्योगात, Ai+ Smartphone एक वेगळा मार्ग निवडत आहे — मोहिमेपूर्वी संवाद, विक्रीपूर्वी अभिप्राय आणि विपणनापूर्वी ग्राहक. "उत्पादन लाँच बहुतेकदा काळजीपूर्वक नियंत्रित कथनांसह असतात अशा काळात, Ai+ एक वेगळा दृष्टिकोन स्वीकारत आहे: लाँच दिवसाच्या विपणनापेक्षा ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देणे. आम्हाला प्रमाणीकरण नको आहे. वापरकर्त्यांच्या फायद्यासाठी निःपक्षपाती अभिप्राय हवा आहे," असे सांगितले Madhav Sheth, CEO of Ai+ Smartphone and Founder of NxtQuantum Shift Technologies.

कोणताही निर्बंध नसेल, परीक्षण मार्गदर्शक तत्त्वे नसतील, पूर्वनिर्धारित संदेश नसतील आणि आयोजित लाँच अनुभव नसतील. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, परीक्षकांना त्यांचा अभिप्राय सामायिक करण्यासाठी सात दिवस मिळेपर्यंत उपकरणे विक्रीस येणार नाहीत. हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर कार्यक्षमतेपासून ते कॅमेरे, बॅटरी आयुष्य, डेटा हस्तांतरण, विश्वासार्हता आणि एकूण वापरकर्ता अनुभवापर्यंत उपकरणांच्या प्रत्येक पैलूची चाचणी घेण्यासाठी परीक्षकांना प्रोत्साहित केले जात आहे.

## ८१ रुग्णांची तपासणी १५ शस्त्रक्रियेसाठी निवड, २५ जणांना चष्मे वाटप

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**
उरुळी कांचन येथील बन्सीलाल पन्नालाल बलदोटा फौंडेशन व पुण्यातील सुप्रसिद्ध बुधराणी हॉस्पिटल यांच्या वतीने दर महिन्याच्या ६ तारखेला उरुळी कांचन येथे मोफत मोतीबिंदू निदान व नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा आहे. नुकताच श्रीराम मंदिर, गुळ आळी, सराफ गल्ली येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हे शिबिर पार पडले. या शिबिराला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून एकूण ८१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली, तर २५ रुग्णांना चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या शिबिरात मोतीबिंदूवर अत्याधुनिक फेको पद्धतीने शस्त्रक्रिया केवळ ५८०० रुपये (७०० रुपये जेवण /प्रवास खर्च) या सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# फुरसुंगी सायकलिस्ट ग्रुपची पुणे ते गोवा सायकल राईड




**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**
जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधून फुरसुंगी सायकलिस्ट ग्रुपच्या वतीने फुरसुंगी (पुणे) ते गोवा या विशेष सायकल राईडचे आयोजन करण्यात आले आहे. पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि सायकलिंग संस्कृतीचा प्रसार हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या राईडमध्ये फुरसुंगी परिसरातील अनेक उत्साही तरुण सायकलिस्ट सहभागी झाले असून अवघ्या दोन दिवसांत सुमारे ५०० किलोमीटरचे अंतर पूर्ण करण्याचा त्यांचा मानस आहे. या साहसी मोहिमेत अमोल वाजे, जीवन पवार, प्रवीण भोसले, गुणवंत गायकवाड, रवींद्र हरपळे, प्रशांत कामठे, रामदास लावंड, संतोष मुसुडगे, किरण कामठे व गोरख कामठे हे सायकलपटू सहभागी झाले आहेत.

फुरसुंगी सायकलिस्ट ग्रुप गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य, फिटनेस आणि सामाजिक जनजागृतीसाठी विविध सायकल मोहिमा राबवत आहे. यापूर्वीही ग्रुपच्या सदस्यांनी तिरुपती बालाजी, अयोध्या, पंढरपूर तसेच इतर अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांपर्यंत सायकल राईड करून उल्लेखनीय प्रवास पूर्ण केले आहेत. सायकलिंगमुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढण्यास मदत होते, इंधनाची बचत होते तसेच पर्यावरणाचे संरक्षणही होते. याच संदेशाचा प्रसार करण्यासाठी जागतिक सायकल दिनानिमित्त ही राईड आयोजित करण्यात आली असल्याचे ग्रुपच्या सदस्यांनी सांगितले.

या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत असून तरुणांनी नियमित सायकलिंगचा अवलंब करून निरोगी जीवनशैली स्वीकारावी, असा संदेश या राईडच्या माध्यमातून देण्यात येत आहे. फुरसुंगी सायकलिस्ट ग्रुपच्या या उपक्रमामुळे परिसरातील युवकांमध्ये सायकलिंगबाबत नवीन प्रेरणा निर्माण होत असून भविष्यातही अशाच साहसी व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे ग्रुपच्या वतीने सांगण्यात आले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.